# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 29/08/2020 (शनिवार)
(दुपार)

---

### शासकीय कामकाजात अळथळा निर्माण करणाऱ्या आरोपी विरूध गुन्हा नोंद

पो.स्टे. जलालखेडा :- अंतर्गत 10 कि.मी अंतरावर मौजा सिंजर येथे दिनांक 27/08/2020 चे 20.30 वा. दरम्यान फिर्यादी कु. अर्चना सुरेशराव विधाते वय 32 वर्ष, रा. वडविहीरा, ता. नरखेड ही आरोग्य सेवीका असुन आरोपी क्र. 1) अभी मोतीदेव ढोपरे याचे वडील मोतीदेव ढोपरे व आई सौ. चंपाबाई ढोपरे हे कोरोना पॉझीटीव्ह पेशंट असल्याने यांना घेण्यासाठी अम्बुलन्स ने त्यांचे घरी गेली असता आरोपी क्र. 1) अभी ढोपरे व 2) कांचन पंचभाई दोन्ही रा. सिंजर ता.नरखेड यांनी फिर्यादीला म्हटले की, "तुम्ही आम्हाला ओरीजनल रिपोर्ट दाखवा तेव्हा आम्ही तुम्हाला पेशंट नेवु देतो, नाहीतर पेशंटला नेवु देत नाही." तेव्हा आरोग्य सेवक डबरासे यांनी मोबाईलमध्ये कोरोना पेशंट लिस्ट दाखविली असता आरोपीतांनी "ते आम्हाला मान्य नाही सही शिक्या निशी रिपोर्ट पाहीजे" असे म्हणुन हातात काठया घेवुन अंगावर मारण्यास धावुन आले व शिवीगाळ करुन पाहुन घेण्याची धमकी दिली. अशाप्रकारे वरील आरोपीतांनी शासकीय कामात अडथळा निर्माण केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीतांविरुध्द कलम 183,188,353,504,506,34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. सोनवणे 7798801816 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर